# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक १८.०७.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १७.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये ०४ ईसमांवर कारवाई करून १,८८०/—रू. चा मुद्‌देमाल जप्त केला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,४८१ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,१६,०००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) मा. अपर पोलीस आयुक्त(दक्षिण प्रभाग) यांचे हस्ते उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा गौरव :—**

मा. श्री वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग), नागपूर शहर यांनी दिनांक १७.०७.२०२६ चे १६.०० वा. दक्षिण प्रादेशिक विभाग कार्यालय नागपूर शहर येथे दक्षिण प्रभाग अंतर्गत येणारे पोलीस ठाणे बजाजनगर, वाडी, सोनेगाव येथील पोलीसांनी तांत्रिक कौशल्य तसेच गोपनिय यंत्रणेचा उत्कृष्ट वापर करुन गुन्हयांची उकल करुन आरोपींचा शोध घेऊन आरोपींना अटक करुन त्यांचेकडून गुन्हयातील मुद्येमाल हस्तगत केला तसेच नंदनवन पोलीसांनी तक्रारकर्ता यांची किमती मुद्येमाल असलेली हरविलेली बॅगचा शोध घेऊन हस्तगत करुन तक्रारकर्ता यांना सुपूर्द केली. अशाप्रकारे उत्कृष्ट कार्य केलेल्या २५ पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा कार्यालयात आयोजीत छोटेखानी समारंभात प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे उल्लेखनिय कार्याचा गौरव केला.

मा. अपर पोलीस आयुक्त यांनी पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेल्या कार्याचे कौतुक करुन त्यांना प्रोत्साहन देऊन प्रामाणिकपणे कर्तव्य बजावण्याचे आवाहन केले. सन्मानित अधिकारी व अंमलदार यांनी या सन्मानामुळे मनोबल उंचावल्याचे व त्यामुळे अधिक जबाबदारीने नागरिकांचे सेवेसाठी कार्य करण्यास प्रेरीत झाल्याची भावना व्यक्त केली.





**३) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक १८.०७.२०२६ चे ०२.२० वा. ते ०३.५० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत, बिलाल मस्जिदजवळ, यशोधरानगर चौक, रंगारीचे घरासमोर एका सुझुकी बर्गमॅन मोपेडवरील दोन इसमांना ताब्यात घेऊन त्यांचे नाव पत्ते विचारले असता, त्यांनी त्यांची नावे १) सलमान अब्दुल रहमान अंसारी वय ३० वर्ष रा. प्लॉट क्र. ४४९, बिलाल मस्जिदजवळ, यशोधरानगर चौक, नागपूर व २) संदीप उर्फ भुऱ्या गणेश लिल्लारे वय २२ वर्ष रा. आराधना नगर, हनुमान मंदीरजवळ, बिडगाव, भांडेवाडी, नागपूर असे सांगितले. एनडीपीएस कायद्यातील तरतुदींचे तंतोतंत पालन करुन, पंचासमक्ष त्यांची व मोपेडची झडती घेतली असता, त्यांचे ताब्यात अंमली पदार्थ हिरव्या रंगाचा गांजा एकुण वजनी १ किलो २५० ग्रॅम कि. ३१,२५०/— रु. चा मिळुन आला. आरोपींचे ताब्यातुन गांजा व सुझुकी बर्गमॅन मोपेड असा एकुण १,३१,२५०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब)(ii),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे यशोधरानगर येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. दोन्हा आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींना मुद्देमालासह यशोधरानगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भारत क्षीरसागर व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.




**३) भांडेवाडी पोलीसांची कामगिरी :— खुनाचे गुन्हयातील पाहिजे आरोपीस अटक.**

फिर्यादी श्रीमती सुशिला प्रितमलाल बोरकर वय ६२ वर्ष रा. हनुमान नगर, रेल्वे स्टेशन जवळ, भांडेवाडी, नागपूर यांचा मुलगा नामे गणेश उर्फ गुरुदेव प्रितमलाल बोरकर वय ४५ वर्ष याचे आरोपी सौ. मनिषा गणेश बोरकर उर्फ मनिषा शांताराम पारधी वय ३७ वर्ष हिचेसोबत १४ वर्षापुर्वी लग्न झाले होते. गणेश हा आरोपी मनिषाचा दुसरा पती होता. गणेश व आरोपीचे नेहमी पारिवारीक कारणाने झगडा भांडण व्हायचे. भांडणाला कंटाळून मनिषा ही मुलांना घेऊन पतीचे घर सोडुन शामनगर, पारडी, नागपूर येथे राहत होती. त्यांचे एकदा कौटुंबिक भांडण झाले असता, आरोपी मनिषाने तीचे पतीला 'गणेश बोरकर, तुझा मर्डर करणार तर, मीच करणार, तु पाहुन घे' अशी धमकी सुध्दा दिली होती. दिनांक ०२.०७.२०२६ चे २०.१५ वा. ते २०.२० वा. चे

दरम्यान, फिर्यादीचा मुलगा गणेश हा पोलीस ठाणे भांडेवाडी हद्दीत रेल्वे स्टेशन जवळील चहाचे दुकानातून घरी येत असता, हनुमान नगर येथील चकोलेच्या घरासमोर, अनोळखी इसमांनी गणेशला जिवानिशी ठार मारण्याचे उद्देशाने त्याचेवर धारदार शस्त्राने वार करुन त्यास जिवानिशी ठार केले. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे भांडेवाडी येथे आरोपींविरूध्द कलम १०३(१),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ५ चे अधिकारी व अंमलदार यांनी यापुर्वी आरोपी क्र. १) मनिषा गणेश उर्फ गुरुदेव बोरकर वय ३७ वर्ष रा. हनुमान नगर, प्लॉट क्र. १७६४, ह.मु. शामनगर, बाजार चौक, तडस यांचे घरी किरायाने, नाल्याचे बाजुला, भांडेवाडी, नागपूर २) अभिजीत पुरुषोत्तम साखरे वय २९ वर्ष रा. वार्ड क्र. ६, दशरथ कोहळे यांचे घरी किरायाने, नाका क्र. ७ जवळील धर्मशाळेमागे, कन्हान ता. कामठी जि. नागपूर ह.मु. आनंदनगर झोपडपट्टी, बबलु बर्वेचे घराजवळ, कन्हान, नागपूर यांना अटक केली होती. तसेच गुन्हयाचे तपासात भांडेवाडी पोलीसांनी दोन विधीसंघर्षग्रस्त बालक यांना ताब्यात घेतले होते. गुन्हयातील आरोपी अर्जुन प्रशांत पटले वय २१ वर्ष रा. वार्ड क्र. ६, बजरंग पार्क, जुनी कामठी, नागपूर हा गुन्हा केल्यापासून मिळून आला नव्हता. भांडेवाडी पोलीसांनी प्राप्त खात्रीशीर माहितीवरुन आरोपीची माहिती काढून, सापळा रचून त्यास खात, ता. मौदा, जि. नागपूर येथून ताब्यात घेतले व गुन्हयात अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग), श्री. वसंत परदेशी, मा. पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ५) श्री. नित्यानंद झा, मा. सहा. पोलीस आयुक्त (पारडी विभाग) श्री. रोहीत ओव्हाळ यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. नितीन चरडे, पोउपनि दीपक चालुरकर, पोहवा प्रशांत काकडे, दिनेश यादव, अश्विन बडगे, पंकज लांडे, सुनिल वानखेडे, पोअं सागर यादव, सचिन दुबे, प्रविण इनवाते, मिलींद ठाकरे यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे कळमणा :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १७.०७.२०२६ चे ०७.४५ वा. चे सुमारास, फिर्यादीचे मोठे भाऊ नामे निलेश मुरलीधर पारधी वय ४१ वर्षे, रा. वार्ड क्र. २, रामक्रिष्ण सोसायटी, पाणी टाकीजवळ, येरखेडा, कामठी नागपूर हे नेहमी प्रमाणे त्यांचे डयुटीवर स्प्लेंडर मोटारसायकल क्र. एमएच ४० झेड ९७२२ ने पोलीस ठाणे कळमणा हद्दीत जुनी कामठी, कळमणा रोड, केतन रेस्टारेंट समोरुन जात असतांना, बर्डीकडून कामठीकडे जाणारी लाल रंगाची बस क्र. एमएच ३१ एफसी ०९७१ चे चालकाने त्याचे ताब्यातील बस भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे भावाचे मोटारसाकलला समोरुन धडक देऊन त्यांचे जागीच मरणास कारणीभुत झाला.

याप्रकरणी फिर्यादी प्रशांत मुरलीधर पारधी वय ३५ वर्ष रा. वार्ड क्र. २, रामक्रिष्ण सोसायटी, पाणी टाकीजवळ, येरखेडा, कामठी, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमणा येथे पोउपनि अजय गरजे

८८३०००१७०२ यांनी आरोपी बस चालकाविरूध्द कलम २८१,१०६(१) भा.न्या.सं., सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे वाठोडा :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १६.०७.२०२६ चे १०.३० वा. ते दिनांक १७.०७.२०२६ चे १०.५८ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत प्लॉट क्र. ३३, जिजामाता नगर, पांढुर्णा रोड, वाठोडा, नागपूर येथे राहणारे फिर्यादी शरद रामकृष्ण झंझाडे वय ४२ वर्ष हे आपले राहते घराला कुलुप लावुन डयुटीवर सुतगिरणी एमएसईबी ऑफीस, ताजबाग येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखडी आलमारीतील रोख ४०,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १,७९,५००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाठोडा येथे मपोउपनि. पुजा शेळके ७४१४९४९६२६ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**